महाराष्ट्र टाईम्स

पुणे ■ मंगळवार, १२ मार्च २०१३
www.facebook.com/matapune



चैत्राली चांदोरकर




# सॅनिटरी नॅपकिनच्या कचऱ्याबाबत 'स्वच्छ' आक्रमक

## कंपन्यांविरुद्ध राबवली 'सेंड इट बॅक' मोहीम

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

महिलांच्या आरोग्यासाठी सॅनिटरी नॅपकिन उपयोगी असले तरी त्यांची विल्हेवाट करणे आमच्यासाठी किळसवाणे काम ठरते आहे. नॅपकिन्सचे उत्पादन करणाऱ्या कंपनीनेच त्यांच्या विल्हेवाटीची जबाबदारी उचलावी, अशी मागणी स्वच्छ संस्थेने केली आहे. महिला दिनानिमित्त संस्थेतर्फे 'सेंड इट बॅक' ही मोहीम राबविण्यात येत असून वापरलेल्या सॅनिटरी नॅपकिन्सची पोती शुक्रवारी कंपन्यांना भेट म्हणून पाठविण्यात आली.

सॅनिटरी नॅपकिन्सचा वापर दिवसेंदिवस वाढत असून त्याच्या विल्हेवाटीच्या नियोजनबाद्दल महापालिका आणि उत्पादन करणाऱ्या कंपन्या कोणीही जबाबदारी उचलण्यास तयार नाही. त्यामुळे कचरा वेचकांची कोंडी झाली आहे. कित्येक घरातून हा कचरा वेगळ्या पिशवीतून टाकला जात नसताना तो उचलताना कर्मचाऱ्यांना किळस वाटते. महिलांना हा कचरा वेगळा द्या, असे सांगूनही त्या वर्गीकरण करीत नाहीत. यामुळे पुरुष सहकाऱ्यांनाही स्वतःच्या हाताने हा कचरा वेचावा लागतो. नॅपकिन्समुळे आता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. गरीब आहोत म्हणून आम्ही काहीही उचलायचे का, असा प्रश्न कर्मचाऱ्यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला.

याबद्दल 'स्वच्छ'च्या मालती गाडगीळ म्हणाल्या, 'सॅनिटरी नॅपकिन्सची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी आम्ही आत्तापर्यंत अनेकवेळा पत्र पाठविली आहेत. या समस्येचे पर्यायही सुचविले आहेत. मात्र त्यांच्याकडून कोणतेही उत्तर आले नाही. यासाठी महापालिकेकडे आमचा पाठपुरावा सुरू आहे. जानेवारी महिन्यात एक बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी या कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांना महापालिकेने बोलावले होते. पण त्यांच्याकडून एकही पदाधिकारी बैठकीला उपस्थित राहिला नाही. यावर मार्ग काढण्याची गरज आहे.'

### सॅनिटरी नॅपकिन्ससाठी स्वच्छचे पाकीट वापरा

कचरापेटीत टाकलेले नॅपकिन कर्मचाऱ्यांना हाताळण्याची वेळ येऊ नये यासाठी स्वच्छ संस्थेने कागदी पिशव्या तयार केल्या आहेत. यावर स्वच्छचे लेबलही लावण्यात आले आहे. महिलांनी या पाकीटात नॅपकिन ठेवले तर वर्गीकरण सोपे होणार आहे. स्वच्छतर्फे सध्या या पाकिटांची विक्री सुरू आहे. अधिकाधिक महिलांनी या पाकिटांचा वापर करावा, असे आवाहन गाडगीळ यांनी केले.